Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 16/07/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

Page No. 04

आपल्या बातम्या, आपल्या बाताम्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## चतुरस्त्र कथाकार वामन कृष्ण चोरघडे



वामन कृष्ण तथा बापूसाहेब चोरघडे हे मराठी लघुकथा लेखक होते. त्यांचा जन्म १६ जुलै १९१४ रोजी नागपूर जिल्ह्यातील नरखेड गावी झाला. कथासंग्रहांशिवाय त्यांनी सुमारे ९२ ललितलेख, चरित्रे, प्रबंध, पाठ्यपुस्तके, इ. लिहिले तसेच त्यात योगदान दिले. त्यांनी नागपूरला कला शाखेत बी. ए. केले तर अर्थशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पुढे काही काळ त्यांनी शिक्षा मंडळ, वर्धा येथील गोविंदराम सेक्सारिया वाणिज्य महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. तसेच ते नागपूरच्या गोविंदराम सेक्सारिया अर्थवाणिज्य महाविद्यालयात उपप्राचार्य होते. ते दोन वर्षे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचे अध्यक्ष होते.

१९३० पासून त्यांनी महात्मा गांधींच्या असहकार आंदोलनात भाग घेतला. १९४२ च्या चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. या दरम्यान त्यांचा महात्मा गांधी, काका कालेलकर, दादा धर्माधिकारी, विनोबा भावे यांच्याशी जवळून संबंध आला. वामनरावांच्या मनावर गांधी-विनोबांच्या तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव होता. वामनरावांचा पहिला कथासंग्रह 'सुषमा' त्यानंतर 'हवन', 'यौवन', 'प्रस्थान', 'पाथेय', 'संस्कार', 'नागवेल', 'मजल', 'बेला', 'ख्याल', 'ओला दिवस' असे कथासंग्रह त्यांच्या खाती जमा आहेत. वामनराव प्रतिभावंत कथाकार होते. 'साने गुरुजींचे ओझरते जीवन दर्शन', 'अहिंसेची साधना', 'अहिंसा विवेचन', 'भारताचा आधुनिक आर्थिक इतिहास' या कथेतर लेखनातून-ग्रंथांतून वामनरावांनी आपल्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींचे आणि तत्त्वज्ञानाचे मार्मिक विवेचन केलेले आहे. वामनराव पुढे गांधीवादी लेखक म्हणूनही ओळखले जायचे. १९७९ मध्ये विदर्भातील चंद्रपुरात संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद वामनरावांनी भूषविले. अशा या सुप्रसिद्ध लघुकथाकाराचे १ डिसेंबर १९९५ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jul 16, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON · CENTRAL LIBRARY · YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401